महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०,
ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

**जाहिर सूचना**

क्रमांक : १०/एनजीपी/मान्यता/जाहीर सूचना/२०२२-२३/ ३१५ दिनांक : - 4 APR 2022

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली (AICTE ) यांनी सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षाकरीता मान्यता प्रक्रीयेसाठी प्रसिध्द केलेल्या जाहीर सूचनेद्वारे[PUBLIC NOTICE FOR APPROVAL PROCESS २०२२-२३] एआयसीटीई ॲप्रुव्हल प्रोसेस हँडबुक २०२२-२३ मधील मार्गदर्शक सूचनांच्या आधारे ऑन लाईन पध्दतीने अर्ज दिनांक **२९.०३.२०२२ ते दि. २२.०४.२०२२** पर्यंत व विद्यमान संस्थांसाठी दंड भरून मान्यतेस मुदतवाढ मिळविण्यास ऑन लाईन अर्ज सादर करण्याचा शेवटचा दिनांक २९.०४.२०२२ हा निर्धारीत केलेला आहे. त्यानुसार व्यावसायिक अभ्यासक्रमासंदर्भात परिषदेस केलेल्या अर्जांच्या अनुषंगाने या संचालनालयाच्या संकेतस्थळावर माहिती भरण्याकरीता दि. ०७.०४.२०२२ पासून http://www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी निर्धारीत केलेल्या वेळापत्रकानुसार लिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्यासाठी विद्यमान संस्थांनी संचालनालयाने दिलेला संकेतांक व पासवर्ड द्वारे लॉगइन करुन दि २३.०४.२०२२ पर्यंत व AICTE यांचेकडे दंड भरुन मान्यतेस विस्तारावावत सादर केलेल्या अर्जाची माहिती दि. ३०.०४.२०२२ पर्यंत भरून, भरलेल्या माहितीची निश्चिती [Confirm] करण्यात यावी. तसेच शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून विद्यापीठांशी / मंडळाशी संलग्न पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका इ. स्तरावर अभियांत्रिकी / हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरींग टेक्नॉलॉजी/ मॅनेजमेंट / एम.सी.ए. या व्यावसायिक तांत्रिक अभ्यासक्रमाच्या नविन तांत्रिक शिक्षण संस्था APH २०२२-२३ मधील तरतूदीनुसार) सुरू करणाऱ्या संस्थांनी संचालनालयाच्या संकेतस्थळावर नवीन नोंदणी करुन त्याअनुषंगाने आवश्यक ती माहिती भरून, भरलेल्या माहितीची निश्चिती [Confirm] करावी.

१. विद्यमान व शैक्षणिक वर्ष २०२२.२३ पासून नव्याने सुरू होणाऱ्या संस्थांनी (APH २०२२-२३ मधील तरतूदीनुसार) दि. २२.०२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेले नोंदणी शुल्क सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे अदा करण्यात यावे. सदर नोंदणी शुल्क अदा केल्याच्या पावतीची साक्षांकीत प्रत सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये यांचेकडे प्रस्तावासोबत सादर करावी.

२. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली व वास्तुकला परिषद, नवी दिल्ली यांना केलेल्या खालील प्रकारच्या अर्जाच्या अनुषंगाने प्रत्यक्ष तपासणी करण्यात येणार आहे.

   i. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून विद्यापीठ / मंडळ संलग्न पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या नविन तांत्रिक शिक्षण संस्था (APH २०२२-२३ मधील तरतूदीनुसार) सुरू करणे.
   ii. एमसीए / एमवीए अभ्यासक्रम संचलित करणाऱ्या बिगर तांत्रिक संस्थानी नवीन तांत्रिक संस्था म्हणून अर्ज करणे
   iii. विद्यमान संस्था बंद करून तेथे नवीन व्यावसायिक अभ्यासक्रमाची संस्था सुरू करणे
   iv. विद्यमान संस्थेच्या साईट / लोकेशन मध्ये बदल करणे.
   v. महिला संस्थेचे को-एज्युकेशन मध्ये परिवर्तन व त्याउलट
   vi. पदविका पातळीच्या संस्थेचे पदवी पातळीच्या संस्थेत रुपांतरण आणि त्याउलट करणे.
   vii. विद्यमान संस्थेत नवीन विद्याशाखा (Programme) / स्तर (Level) सुरू करणे.
   viii. विद्यमान संस्था बंद करणे
   ix. ट्रस्ट / सोसायटी / कंपनीच्या नावात/ पत्त्यात बदल करणे

वरील अर्जांची प्रत (Hard Copy) संबधित संस्थांनी AICTE च्या ऑन लाईन पध्दतीने सादर केलेल्या दिनांकाच्या दुसऱ्या किंवा दिनांक २३.०४.२०२२ यापैकी जे अगोदर असेल त्या दिनांकास सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे सादर करावा. याबाबत विभागीय कार्यालयाकडे शासनाने विहित केलेले नोंदणी शुल्क भरल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी. तसेच वरील प्रस्ताव सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय यांना सादर करतांना संबंधित प्रस्तावावर ठळक अक्षरात "-----------------------" **(प्रस्तावाचा विषय) नमूद करावा.**

३. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी संदर्भीय जाहिर सूचनेत नमूद केलेल्या अर्जापैकी परिच्छेद क्रमांक २ मध्ये नमूद केलेल्या अर्जाव्यतिरीक्त उर्वरीत अर्जांची माहिती संचालनालयाच्या संकेतस्थळी उपलब्ध करून दिलेल्या पोर्टलवर भरणे अनिवार्य राहील. सबब सर्व संबंधित संस्थांना कळविण्यात येते की, याबाबतची माहिती संचालनालयाचे संकेतस्थळावरील पोर्टलवर भरुन अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेस सादर केलेल्या प्रस्तावाची हार्ड कॉपी व नोंदणी शुल्क अदा केल्याच्या पावतीच्या प्रतीसह (मुखपृष्ठावर संस्थेचे नांव व डीटीई संकेतांकासह), सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय यांचेकडे जमा करण्यात यावी.

४. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीताच्या मान्यतेसाठी सर्व संस्थांनी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांना ऑन लाईन सादर केलेल्या अर्जाची माहिती या संचालनालयाने http://www:dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळी उपलब्ध करून दिलेल्या लिंकवर भरणे अनिवार्य राहील अन्यथा अशा संस्थाच्या अर्जाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही संचालनालय स्तरावरुन करण्यात येणार नाही, याची त्यांनी नोंद घ्यावी. तसेच याबाबत संबंधित संस्थांना काही अडचणी आल्यास त्यांनी अधिक माहितीसाठी संबंधित तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालयाशी संपर्क साधावा.

(डॉ. अभय वाघ)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत,

१. सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर
त्यांना कळविण्यात येते की, प्रस्तुत प्रकरणी दि. २२.०२.२०१८ अन्वये शासनाने निर्धारीत केलेले नोंदणी शुल्क संबंधित संस्थाकडून घेण्यात यावे. तसेच परिच्छेद क्रमांक २ मध्ये नमूद केलेल्या **प्रस्तावाबाबत AICTE ने APH २०२२-२३ मध्ये निर्धारीत केलेले/ फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया / वास्तुकला परिषद यांच्या मानकांनुसार प्रत्यक्ष तपासणी करुन त्याबाबतचा अहवाल संबंधित संस्थानी परिषदेस सादर केलेल्या प्रस्तावाच्या दिनांकापासून २ दिवसांचे आत खास दुतामार्फत या संचालनालयास सादर करावेत.**

२. प्रणाली व्यवस्थापक, कार्यासन क्रमांक ३ (संगणक कक्ष), तंत्र शिक्षण, मुख्य कार्यालय, मुंबई, यांनी संकेतस्थळ अद्ययावत करुन घेऊन संकेतस्थळावरील प्राप्त माहितीचे विश्लेषण करावे तसेच गोषवारा उपलब्ध करुन देण्यात यावा.

३. सर्व संबंधित संस्था (संबंधित सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचे मार्फत)